**राज्यामध्ये राज्यस्तरीय योजनेअंतर्गत (सर्वसाधारण / अनुसूचित जाती उपयोजना/ आदिवासी क्षेत्र उपयोजना) "१००० मांसल कुक्कूट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कूट पालन व्यवसाय सुरु करणे" या नाविन्यपुर्ण योजनेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**शासन निर्णय क्रमांक राज्ययो-२०१२/प्र.क्र.१६२/पदुम ४**
**कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय -विस्तार, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक १४ फेब्रुवारी, २०१३**

**प्रस्तावना :-**

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या शासन निर्णय क्र. राज्ययो/कुक्कुट-२०११/ प्र.क्र. ६६ पदुम-४ दिनांक १.७.२०११ अन्वये मंजूर करण्यात आलेली " कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कूट पक्षी पालन व्यवसाय सुरु करणे " ही राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजना कंत्राटदार कुक्कूट कंपनीच्या सहाय्याने राबवावयाची होती.या योजनेच्या अंमलबजावणीकरीता आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे कार्यालयाकडून राज्यस्तरावर कंत्राटदार कुक्कूट कंपन्यांच्या निवडीकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास कंत्राटदार कंपन्यांकडून प्रतिसाद न मिळाल्याने कंत्राटदार कुक्कूट कंपन्यांच्या निवडीकरीता जिल्हास्तरावर निविदा मागविण्यात आल्या. नाशिक व कोल्हापूर या जिल्ह्यातून कंत्राटदार कुक्कूट कंपन्यांकडून प्रतिसाद मिळाल्याने, सदर जिल्ह्यात ही योजना सन २०११-१२ मध्ये राबविण्यात आली. राज्यातील उर्वरीत जिल्ह्यात या योजनेकरीता कंत्राटदार कुक्कूट कंपन्यांकडून प्रतिसाद न मिळाल्याने ही योजना राबविता येवू शकली नाही. "कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कूट पक्षी पालन व्यवसाय सुरु करणे" या योजनेस लाभार्थ्यांकडून राज्यभरातून मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळालेला होता. ग्रामीण भागात या व्यवसायाद्वारे होणारी रोजगार निर्मिती तसेच कुक्कूट व्यवसायाच्या योजनेस लाभार्थींकडून मोठया प्रमाणात मिळालेला प्रतिसाद ही बाब विचारात घेऊन १२ व्या पंचवार्षिक योजना कालावधीत "कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कूट पक्षी पालन व्यवसाय सुरु करणे" या योजनेऐवजी कंत्राटदार कंपनीच्या सहभागाशिवाय "१००० मांसल कुक्कूट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कूटपालन व्यवसाय सुरु करणे" ही नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. जेणेकरुन राज्यातील सर्वभागातील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येऊ शकेल. त्याअनुषंगाने दिनांक ३० जानेवारी, २०१३ रोजी च्या बैठकीतील मंत्रीमंडळाच्या मान्यतेनुसार खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

**"१००० मांसल कुक्कूट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुटपालन व्यवसाय सुरु करणे"** या नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय योजनेअंतर्गत योजनेस (सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना (वि.घ.यो.) व आदिवासी उपयोजनेअंतर्गत) याद्वारे शासनाची प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. सदरची योजना १२ व्या पंचवार्षिक योजना कालावधीत सन २०१२-१३ पासून राज्यात राबविण्यात यावी.

चालू वर्षी या योजनेसाठी उपलब्ध निधी विचारात घेता, ज्या जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक (Human Development Index) कमी आहे, अशा शेवटच्या ५ जिल्ह्यांमध्ये सदर योजना सन २०१२-१३ मध्ये राबविण्यात यावी व पुढील कालावधीत उपलब्ध निधी विचारात घेवून वरील निकषानुसार इतर जिल्ह्यामध्ये या योजनेची व्याप्ती वाढविण्यात यावी.

१००० मांसल कुक्कूट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कूट पालन व्यवसाय सुरु करणे या राज्यस्तरीय योजनअंतर्गत एका युनिटद्वारे (प्रति लाभार्थी) १००० मांसल पक्षी संगोपन करावयाचे असून १००० मांसल पक्षी संगोपनाच्या बाबनिहाय खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | लाभार्थी / शासन सहभाग | एकुण अंदाजीत किंमत |
|---|---|---|---|
| १ | जमीन | लाभार्थी | स्वतःची / भाडेपट्टीवर घेतलेली |
| २ | पक्षीगृह (१००० चौ. फुट) स्टोअर रुम, पाण्याची टाकी, निवासाची सोय, विद्युतीकरण इ. | लाभार्थी / शासन | रु. २,००,०००/- |
| ३ | उपकरणे, खाद्याची / पाण्याची भांडी, बुडर इ. | लाभार्थी / शासन | रु. २५,०००/- |
| | एकुण | | रु. २,२५,०००/- |

या योजने अंतर्गत वर नमूद केल्याप्रमाणे पक्षी संगोपनासाठी पक्षीगृह व इतर मुलभूत सुविधा उभारणेकरीता सर्वसाधारण योजनेतून खुल्या प्रवर्गातील लाभार्थीना प्रति युनिट रु. २,२५,०००/- प्रकल्प खर्चाच्या ५०% म्हणजेच रु १,१२,५००/- या मर्यादेत. अनुसूचित जाती उपयोजना (विघयो) व आदिवासी उपयोजनेतून अनुक्रमे अनुसूचित जाती / जमातीच्या लाभार्थ्यांना प्रकल्प खर्चाच्या ७५% म्हणजेच रु. १,६८,७५०/- मर्यादेपर्यंत शासकीय अनुदान अनुज्ञेय देय राहील. प्रकल्पासाठी शासकीय अनुदानाव्यतिरिक्त खुल्या प्रवर्गातील लाभार्थ्यांनी उर्वरीत ५०% रक्कम म्हणजेच रु. १,१२,५००/- व अनुसूचित जाती / जमातीच्या लाभार्थ्यांने २५% रक्कम म्हणजेच रु.५६,२५०/- स्वतः अथवा बँकेकडून / वित्तीय संस्थाकडून कर्ज घेऊन उभारावयाची आहे. बँक / वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणा-या खुल्या प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी किमान १०% स्वहिस्सा व उर्वरीत ४०% बँकेचे कर्ज त्याचप्रमाणे अनुसूचित जाती / जमातीच्या लाभार्थ्यांसाठी किमान ५% स्वहिस्सा व उर्वरीत २०% बँकेचे कर्ज याप्रमाणे रक्कम उभारावयाची आहे.

**लाभार्थी निवडीचे निकष :-**

या योजनेमध्ये लाभार्थी निवडीचे निकष खालील प्रमाणे असतील. सर्वसाधारण प्रवर्गातील तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची निवड खालील प्राधान्य क्रमानुसार करण्यात यावी.

१. अत्यल्प भुधारक शेतकरी (१ हेक्टर पर्यंतचे भुधारक)
२. अल्प भुधारक शेतकरी (१ ते २ हेक्टर पर्यंतचे भुधारक)
३. सुशिक्षित बेरोजगार (रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)
४. महिला बचत गटातील लाभार्थी/वैयक्तीक महिला लाभार्थी (अ.क्र.१ ते ३ मधील)

**लाभार्थी निवड समिती :-**

या योजने अंतर्गत लाभार्थीची निवड खालील जिल्हास्तरीय समिती मार्फत करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (राज्यस्तर) | सदस्य |
| ३. | प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ४. | जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी (राज्यस्तर) | सदस्य |
| ५ | जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ६. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ७. | जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | सदस्य सचिव |

**योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना :-**

१. अंमलबजावणी अधिका-यांनी या योजनेस व्यापक प्रसिध्दी देवून लाभार्थीकडून अर्ज मागविण्यात यावेत.

२. योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्याने करावयाच्या अर्जाचा नमुना व त्यासोबत जोडावयाची इतर आवश्यक कागदपत्रे याचा तपशील आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या स्तरावर निश्चित करून, तो क्षेत्रिय अधिका-यांना पाठविण्यात यावा. तसेच सदर अर्जाचा नमुना आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावा.

३. लाभार्थी निवडताना ३०% महिला व ३% विकलांग लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत प्राधान्य देण्यात यावे.

४. जिल्हास्तरावर लाभार्थी निवड समितीने निवड केलेल्या लाभार्थ्यांची यादी आयुक्त पशुसंवर्धन,पुणे तसेच संबधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी.

५. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१ यांचेकडुन पक्षीगृहाच्या बांधकामाचा आराखडा निश्चित करुन सदरचा आराखडा सर्व संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांना पाठविण्यात यावा. सदर आराखड्याप्रमाणेच जिल्ह्यातील पक्षीगृहाचे बांधकाम लाभार्थ्याने करावे.

६. या योजनेअंतर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यास सर्वप्रथम स्वहिश्याच्या रक्कमेतून पक्षीगृहाचे बांधकाम व इतर मुलभूत सुविधा उभाराव्यात. लाभार्थ्याने केलेल पक्षीगृह बांधकाम उभारलेल्या मुलभूत सुविधांची प्रत्यक्ष तपासणी व मुल्यांकन संबधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयातील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व बँकेचे प्रतिनिधी (कर्ज प्रकरणी) यांनी करुन त्याप्रमाणे तसा अहवाल जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे सादर करावा. सदर अहवालानूसार जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हे उर्वरीत कामासाठी शासकीय अनुदानाची रक्कम बँकेकडे (कर्ज प्रकरणी) अथवा लाभार्थ्याच्या बँक खात्यामध्ये (लाभार्थी हिस्सा प्रकरणी) जमा करावी.

७. संबधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी लाभार्थ्याने केलेले पक्षीगृहाचे बांधकाम व प्रकल्पासाठी उभारलेल्या मुलभूत सुविधांचे मुल्यांकन करुन त्यानुसार लाभार्थ्यांस देय अनुदानाची रक्कम निश्चित करुन अदा करावी.

८. या योजनेअंतर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यांनी प्रति वर्षी ५ ते ७ बॅचेस मध्ये मांसल कुक्कुट पक्षाचे संगोपन करावयाचे असून त्यासाठी आवश्यक निविष्ठा (प्रत्येक बॅचसाठी १००० मांसल कुक्कुट पक्षी, त्यासाठी आवश्यक पक्षी खाद्य, औषधी इ.) स्वखर्चाने उपलब्ध करुन घेऊन सदर पक्षांची विक्रीची व्यवस्था लाभार्थीनी स्वत: करावी. . अथवा लाभार्थी स्वत: कंत्राटदार कंपनीशी करार करून हा व्यवसाय करु शकतील.

९. सदर योजनेच्या आर्थिक निकषाच्या अधिन राहून योजना यशस्वीपणे राबवण्याकरिता आवश्यक त्या इतर मार्गदर्शक सूचना आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी त्यांच्या स्तरावरून क्षेत्रिय अधिका-यांना देण्यात याव्यात.

१०. कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कुट पक्षी पालन व्यवसाय सुरू करणे या योजनेसाठी सन २०१२-१३ मध्ये उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पिय निधीचा विनियोग त्याच लेखाशिर्षाखाली १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरू करणे या नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय योजनेसाठी करण्यात यावा.

११. सदर योजनेचे अमलबजावणी अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हे राहतील. विभागीय स्तरावर संबंधित प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व राज्याकरिता आयुक्त पशुसंवर्धन, पुणे हे संनियंत्रण अधिकारी राहतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नांवाने,**

**(डॉ मा.मा.सवाईसोनकांबळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
४. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
५. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
६. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे मध्यवर्ती कार्यालये
७. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०० ०२०.
८. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०० ०२०.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती)
१२. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती).
१९. सर्व जिल्हाधिकारी.
२०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२१. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२२. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन
२३. विधीमंडळ ग्रंथालय (१० प्रती)
२४. उपसंचालक, लेखा व कोषागार, कोकण विभाग, कोकण भवन, नवीन मुंबई/ पुणे/ नागपूर/औरंगाबाद/ नाशिक/अमरावती.
२५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२६. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त.
२७. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद.
२८. अवर सचिव, पदुम-३/कक्ष अधिकारी पदुम-१/१६, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९. निवड नस्ती.